प्रसिद्धी : दरमहा १५ तारखेस

दि यशवंत बँक फलटणचे मुखपत्र

RNI No. MAHMAR/2010/31891

# यशवंत इन हाऊस

## YASHWANT IN HOUSE


• फलटण जि. सातारा. • वर्ष १२ वे • अंकः ७ वा • जुलै २०२२ • पृष्ठ १६



गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णुः गुरूर्देवो महेश्वरः ।
गुरूः साक्षात् परं ब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ।।

अंतरंग

१) मुखपृष्ठ | २) मनाचे श्लोक | ३) विशेष ज्ञान | ४/५) दिनविशेष | ६/७) कथा | ८) शाखा वर्धापनदिन | ९/१०) रक्तदान शिबिर | ११) ठेव योजना | १२) सत्कार समारंभ | १३) बँकेच्या नविन ठेव कर्ज योजना | १४/१५) ठेव योजना | १६) कर्ज योजना





समर्थ रामदास स्वामी रचित

# ॥मनाचे श्लोक॥

समर्थांच्या मते माणसाने दुसऱ्याला उपदेश करण्यापेक्षा स्वतः सुधारावे, स्वतःमध्ये बदल घडवून आणावा आणि इतरांना मदत करावी. जीवन आनंदाने कसे जगावे आणि सर्वांशी प्रेमाने कसे वागावे याची कला शिकविणारा ग्रंथ म्हणजे मनाचे श्लोक होय. समर्थ रामदास रचित

"मनाचे श्लोक" अर्थासहित मालिका - भाग २१

*जय जय रघुवीर समर्थ ।*

**श्लोक क्र. १०६**

बरी स्नानसंध्या करी येकनिष्ठा ।
विवेकें मना आवरी स्थानभ्रष्टा ।
दया सर्व भूतीं जया मानवाला ।
सदा प्रेमळू भक्तिभावें निवाला ।।

मनुष्याने स्नानसंध्या इत्यादी शास्त्रविहित कर्मे एकनिष्ठेने करावीत. एकाग्र न होणाऱ्या, नको तिथे जाणाऱ्या मनास विवेकाने आवर घालावा. ज्या मनुष्यास प्राणिमात्राबद्दल दया असते आणि ज्याला परमेश्वराबद्दल भक्तिभाव असतो, त्यालाच समाधान मिळते.

**श्लोक क्र. १०७**

मना कोप आरोपणा ते नसावी ।
मना बुधि हे साधुसंगीं वसावी ।
मना नष्ट चांडाळ तो संग त्यागी ।
मना होइ रे मोक्षभागीं विभागी ।।

हे मना, राग येऊ देऊ नकोस, संतांच्या संगतीमध्ये बुध्दी वसू दे. हे मना, दुष्ट व नीच माणसाची संगत टाळावी. अशा प्रकारे वागून तू मोक्षाचा भागीदार हो.

**श्लोक क्र. १०८**

सदा सर्वदा सज्जनाचेनि योगें ।
क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे ।
क्रियेवीण वाचाळता ते निवारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।

हे मना, सज्ञन-साधू-संतांच्या संगतीमुळे आचरणामध्ये बदल घडतो व भगवंताची जाणीव होऊन त्याच्याबद्दल भक्ती वाटू लागते. स्वतः आचरण केल्याशिवाय फुकटची बडबड करू नकोस ज्यामुळे वाद-विवाद संपतो, ते संभाषण परमार्थाच्या दृष्टीने हितकारक असते.

**श्लोक क्र. १०९**

जनीं वाद वेवाद सोडूनि द्यावा ।
जनीं सूखसंवाद सूखें करावा ।
जगीं तो चि तो शोकसंतापहारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।

कुणाशीही वाद-विवाद करू नये, मात्र तात्त्विक प्रश्नाबद्दल व भगवंताबद्दल आनंद देणारे संभाषण अवश्य करावे. अशा संभाषणामुळे बुद्धीचे समाधान होऊन मनाचे क्लेश दूर होतात. असे संभाषण पारमार्थिक दृष्टीने हितकारक असते.

**श्लोक क्र. ११०**

तुटे वाद संवाद त्यातें म्हणावें ।
विवेकें अहंभाव यातें जिणावें ।
अहंतागुणें वाद नाना विकारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।

ज्या चर्चेमुळे वाद संपतो, त्याला संवाद असे म्हणतात. मनुष्याने आपल्या विवेकाने अहंकार जिंकावा, अहंकाराने वाद केला तर क्रोधादी अनेक विकार उत्पन्न होतात. ज्यामुळे वाद-विवाद संपतात, ते संभाषण हितकारक असते.



विशेष ज्ञान

# २४ एकादशींची नावे

नुकतीच आषाढी एकादशी संपन्न झाली. वारकऱ्यांनी मोठ्या भक्तीभावाने एकादशीला विठूरायाचे दर्शन घेतले यासाठीच आज एक वेगळी माहिती आपणासमोर ठेवत आहे.

ख्रिस्ती कालगणने प्रमाणेच हिंदू कालगणनेमध्येसुद्धा एका वर्षामध्ये बारा महिने असतात. तर दर तीन वर्षांतून एकदा अधिक महिना येतो.

या प्रत्येक महिन्यात तीस तिथी असून पंधरा तिथींचा एक पंधरवडा असे दोन पंधरवडे असतात. पहिल्या पंधरवड्याला शुक्ल पक्ष असे म्हणतात. तर दुसऱ्या पंधरवड्याला कृष्ण पक्ष अशी संज्ञा आहे.

प्रतिपदा ते पौर्णिमा अशी शुक्ल पक्षाची रचना असते तर प्रतिपदा ते अमावस्या अशी कृष्ण पक्षाची रचना असते.

एकादशी हा हिंदु पंचांगाप्रमाणे प्रतिपदेपासून सुरू होणाऱ्या पक्षातला अकरावा दिवस आहे. हिंदू पंचांगाप्रमाणे महिन्यातला दोन पक्षांत प्रत्येकी एक अशा किमान दोन एकादश्या येतात, तर संपूर्ण वर्षभरामध्ये २४ एकादश्या येतात. अधिक महिना असल्यास त्याच्या दोन एकादशींचा यात भर पडतो. या प्रत्येक एकादशीला स्वतंत्र असे नामकरण केलेले आहे. हि नावे महिन्यानुसार पुढे दिली आहेत.

चैत्र – कामदा, वरूथिनी
वैशाख – मोहिनी, अपरा
ज्येष्ठ – निर्जला, योगिनी
आषाढ – शयनी, कामिका
श्रावण – पुत्रदा, अजा
भाद्रपद – परिवर्तिनी, इंदिरा
आश्विन – पाशांकुशा, रमा
कार्तिक – प्रबोधिनी, उत्पत्ती
मार्गशीर्ष – मोक्षदा, समला
पौष – पुत्रदा, षट्तिला
माघ – जया, विजया
फाल्गुन – आमलकी, पापमोचनी


अधिक महिन्यातल्या दोनही एकादश्यांचे नाव 'कमला' असते.

आषाढी एकादशीच्या दिवशी म्हणजे आषाढ शुक्ल एकादशीला, शेषशायी भगवान श्री विष्णु झोपी जातात. ते कार्तिकी एकादशीपर्यंत झोपलेलेच असतात अशी समजूत आहे. म्हणूनच चातुर्मासाचा आरंभ आषाढ शुक्ल ११ ला होतो व कार्तिक शुक्ल ११ ला चातुर्मास संपतो.

★ ★ ★

## माहे जुलै दिनविशेष

०१ जुलै – स्व.वसंतराव नाईक जयंती, महाराष्ट्र कृषी दिन
११ जुलै – जागतिक लोकसंख्या दिन
१५ जुलै – जागतिक युवा कौशल्य दिन
१८ जुलै – लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मृतिदिन
१९ जुलै – बँक राष्ट्रीयीकरण दिन
२२ जुलै – राष्ट्रीय ध्वज स्वीकृती दिन
२६ जुलै – कारगिल विजय दिन



# २२ जुलै - भारतीय ध्वज स्वीकृती दिन

**ध्वज स्वीकृती दिनः** भारतीय ध्वजाबाबत लोकांना जागृत करण्याचा उद्देष्य त्यामागे आहे. जो ध्वज कोट्यवधी भारतीयांचा समावेश असलेल्या संपूर्ण राष्ट्राचे प्रतिनिधित्व करतो. ब्रिटिश राजवटीपासून भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला जे स्वातंत्र्य मिळाले. ज्याद्वारे सर्व भारतीयांना देशाच्या कोणत्याही भागात जाण्याचा प्रत्येक अधिकार आणि संधी प्राप्त झाली. राष्ट्रीय ध्वज दिन साजरा करण्याच्या माध्यमातून, आम्ही राष्ट्रीय ध्वजाचा स्वीकृती दिन, आमच्या राष्ट्रीय ध्वजाचे महत्व यांचे पुन्हा स्मरण करत असतो आणि त्याला अत्यंत मनोभावाने सॅल्युट, आदर आणि सन्मान देत असतो त्याचप्रमाणे आमच्या नव्या पिढ्यांपर्यंत भारतीय संस्कृती आणि परंपरांचे नेतृत्व करतो.

भारतीय राष्ट्रध्वज (तिरंगा) २२ जुलै १९४७ ला, भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या २४ दिवस आधी अंगीकारला गेला. २४ मार्चला इंग्रजांनी लवकरच भारत सोडून जाण्याचा आपला निर्णय जाहीर केला. स्वतंत्र भारताचा ध्वज कसा असावा हे ठरविण्यासाठी तातडीने एक समिती नेमली गेली. त्यानंतर घटना समितीने २२ जुलैला या ठरावाला मंजुरी दिली. तो दिवस भारत ध्वज स्वीकृती दिन म्हणून साजरा केला जातो.

**परिचय :**

जगातील प्रत्येक स्वतंत्र देशाचा त्यांचा स्वतःचा ध्वज आहे. स्वतंत्र देशाचे ते चिन्ह आहे. भारताचा राष्ट्रीय ध्वज हा क्षितिजाला समांतर म्हणजे आडवा तिरंगी ध्वज असून त्यावर गडद केसरी रंग अगदी वर आहे. मध्यभागी पांढरा तर तळाला हिरवा रंग समप्रमाणात आहेत. पांढऱ्या पट्ट्याच्या मध्यभागी नेव्ही ब्ल्यू रंगाचे अशोक चक्राचे प्रतिनिधित्व करणारे चक्र आहे. त्याची रचना सम्राट अशोकाच्या सारनाथ येथील अशोक स्तंभावरुन घेण्यात आली आहे. हे चक्र त्याच्या राजधानीची रचना भासते. त्या चक्राला २४ आरे आहेत.

**राष्ट्रीय ध्वज स्वीकृती दिन का साजरा केला जातो-**


२२ जुलै रोजी भारतीय राष्ट्रीय ध्वजाचा स्वीकार करण्यात आल्याच्या स्मृत्यर्थ हा दिन साजरा केला जातो. देशभक्तीच्या खऱ्या अर्थाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी तसेच भारतीय लोक विशेषतः तरूण आणि भावी पिढ्यांमध्ये स्वातंत्र्याचा खरा अर्थ आणि उर्जा निर्माण करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय ध्वजाचा स्वीकार करण्यात आला. राष्ट्रीय ध्वज स्वीकृती दिन साजरा करण्याचे आणखीही एक महत्व असून त्याद्वारे भारतीय राष्ट्रीय ध्वजाची किंमत लोकांना कळावी आणि भारतीय ध्वजाचा इतिहास समजावा, म्हणूनही तो साजरा केला जातो. भारतीय राष्ट्रीय ध्वज हा संपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व करत असल्याने लोकांनी त्याचा आदर केला पाहिजे.

**भारतीय राष्ट्रीय ध्वज स्वीकृती दिनाचा इतिहास-**

भारतीय राष्ट्रीय ध्वजाची रचना पिंगाली वेंकय्या यांनी केली असून २२ जुलै १९४७ रोजी प्रथम भारतीय घटक विधानसभेच्या बैठकीत त्यास मान्यता देण्यात आली. म्हणून १९४७ पासून तो २२ जुलै रोजी साजरा केला जात आहे.







सध्याच्या स्वरूपातील राष्ट्रीय ध्वज घटक विधानसभेच्या बैठकीत त्याला भारतीय अधिराज्याचा अधिकृत ध्वज म्हणून जाहिर करण्यात आले, तेव्हापासून अधिकृतपणे अस्तित्वात आला.

**पहिला रंगाचा पट्टा–**

भगवा देशाची मजबुती आणि धैर्य दर्शवत आहे.

**दुसरा रंगाचा पट्टा आणि चक्र–**

पांढरा रंगाचा पट्टा आणि २४ आरे असलेले धर्मचक्र शांतता आणि सत्य दर्शवते. धर्मचक्र ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकातील मौर्य सम्राट अशोक याच्या सारनाथ सिंह राजधानीत कायद्याचे चक्र म्हणून चितारले होते. प्रगतीत जीवन आहे आणि कुंठित अवस्थेत मृत्यु आहे, हे दर्शवण्याचा या चक्राचा हेतू आहे.

२४ आऱ्या या अर्थ, प्रेम, संयम, मनाची विशालता, विश्वासार्हता, निस्वार्थीपणा, त्याग, सदाचरणी, दया, विनयशीलता, सहानुभूती, नैतिक मूल्ये, ईश्वराची भीती, विश्वास, आशा, अध्यात्मिक, दुसर्याच्या मनातील जाणून घेण्याची कुवत, आकर्षक, न्याय, सत्यतावादी, स्वनियंत्रण, सभ्यता, शांततापूर्ण, चांगुलपणा, धैर्य यांचे प्रतिक मानले जाते.

**तिसरा पट्टा–**

हिरवा पट्टा हा सुपीकता, विकास आणि जमिनीची शुभलक्षण दर्शवतो.

★ ★ ★

# ग्राहक प्रतिक्रिया

यशवंत इन हाऊस माहे जुनचे वारीचे मुखपृष्ठ समयोचित आहे. त्यात वारकरी संप्रदाय विठुरायाच्या भक्तीत रममाण दिसते. बँकेमार्फत गरजुंना वैद्यकीय कारणासाठी होणारी मदत ही सामाजिक बांधिलकी दिसून येते. बालकामगार ही समाजाला लागलेली कीड आहे. त्यासाठी बालकामगार विरोधी दिन साजरा करणे हे बँकेसाठी भूषणावह आहे. बँकेमार्फत गृहकर्ज, वाहन कर्ज योजना या गरजूंसाठी वरदान आहेत. बँकेस अनेक शुभेच्छा...

**प्रा. द. आ. कटारे**
माऊली,५३१ ब, कर्णिक नगर,
सोलापूर. ४१३००६



# युगे अठ्ठावीस

भक्त पुंडलीकाला भेटायला पांडुरंग आले आणि आजही त्याने दिलेल्या विटेवरच उभे आहेत तो आईवडिलांच्या सेवेत होता मी कुटीच्या बाहेर येईतोवर तुम्ही या विटेवर उभे रहा . . . . . !
नारदमुनींच्या सांगण्यावरुन त्या रात्रीच श्रीकृष्ण रुक्मिणींनी पुढल्याच दिवशी तातडीने द्वारकेला निघण्याचा निर्णय घेतला. तथापि निघण्यापूर्वी पंढरीच्या भक्तांचा निरोप घेण्यासाठी, श्रीकृष्ण प्रथम पुंडलिकाला भेटण्यास त्याच्या कुटीकडे आले. परंतु आदल्या रात्रीच्या पावसामुळे त्याच्या कुटीसमोर इतस्ततः चिखल पसरले असल्याने त्यांनी अंगणातुनच पुंडलिकास हाक दिली.

साक्षात विष्णुदेव आपल्या दाराशी आलेले पाहून तो गहिवरला आणि आदरभावे म्हणाला, ‘पांडुरंगा माझ्या आईवडिलांची मी प्रातर्विधी उरकत असल्याने कृपया तुम्ही कुटीत येऊ नका. मी थोड्याच वेळेत बाहेर येईन.’

श्रीविष्णुंच्या पायाला चिखल लागू नये म्हणून पुंडलिकानं आपल्या हाताजवळच असलेली एक विट उचलली आणि त्याला मनोभावे नमस्कार करून स्वतःच्या व आईवडिलांच्या माथी स्पर्श करून ती त्याने अंगणात टाकली आणि पांडुरंगास विनंती केली की मी बाहेर येईस्तोवर कृपया तुम्ही ह्या विटेवर उभे रहा.

श्रीकृष्णाने देखील आपल्या भक्ताच्या विनंतीला मान देऊन आपले दोन्ही हात कटिवर ठेवून भोळसपणे त्या विटेवर उभे राहून त्याची वाट पाहु लागले. पुंडलिकाने भगवंताचे हे जिवंत स्वरूप आपल्या आईवडिलांना दाखवून साक्षात श्रीविष्णुंचे दुरुनच मनोभावे दर्शन घेण्यास सहाय्य केले.

श्रीकृष्णाने देखील अगदी खुशीने हात उंचावून त्यांच्या नमस्कारास विनम्रतेने धन्यवाद दिले आणि इथूनच नियतीच्या मनात पुढे काय घडवायच होते हे खुद्द श्रीकृष्णास सुध्दा कळले नाही.


एक घटका होत आला तरी पुंडलिक बाहेर आला नाही आणि इकडे गावातल्या लोकांमध्ये, त्याच्या अंगणात उभे असलेल्या चिंतातूर पांडुरंगाला बघुन शंकेची चर्चा सुरू झाली . थोड्याच वेळात त्याच्या कुटीसमोर भरपूर जनसमुदाय उभा झाला. तसेच श्रीकृष्णांना परतण्यास उशीर का होतोय हे बघायला रखुमाई देखील तिथे आली.

पांडुरंगाच्या हाकेला पुंडलिक बाहेर का येत नाही म्हणून एक सदगृहस्थ त्याच्या कुटीत जाऊन बघतात तर काय, पुंडलिकाचे आईवडील मरण पावलेत आणि त्यांच्या चरणी लीन होवून त्याने देखील स्वतःचे प्राण त्यागले आहे.

पांडुरंगाला ही बाब कळल्यावर त्यांनी तत्काळ आपल्या दिव्य दृष्टीने पुंडलिकाच्या मनातली गोष्ट जाणली आणि जनकल्याणाप्रती त्याची अपार विष्णुभक्ती पाहून उपस्थित जनसमुदाय समोरच त्यांनी त्याच्या आत्म्यास पाचारण केले आणि म्हणाले,

पुंडलिका मी तुझी ही अपार भक्ती जाणली असून तुझ्यावर मी अतिप्रसन्न झालो आहे. ह्या कलीयुगात मात्र कृतयुगातल्या भक्त प्रल्हाद पेक्षाही तुझी माझ्या प्रती असलेली भक्ती श्रेष्ठ मानली जाईल. त्यामुळे इथून पुढे माझ्या कोणत्याही पुजेत प्रथम तुझेच नांव आवर्जुन घेतले जाईल... पुंडलिका.

तसेच जनकल्याणाप्रती असलेली तुझी आस्था पाहून मी अत्यंत प्रसन्न झालो असुन आता जसा विटेवर उभा आहे त्याच स्थितीत पाषाणरुपात ह्याच पंढरीत पुढली २८ युगे माझ्या सर्व भक्तांना मी अखंड दर्शन देत उभा राहीन.



भले ते गोरगरीब, 'मध्यम', श्रीमंत कुणीही तसेच कोणत्याही जातीचे, पंथाचे, धर्माचे असले तरीही जे कोणी माझ्या प्रती आस्था ठेवून स्वतःचे मातापिता, कुटुंब, गुरू, व्यवसाय, समाज व देशाप्रती असलेली आपली सर्व कर्तव्ये पार पाडत माझी भक्ती करतील मी त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण करीन. येणाऱ्या सर्व संकटांपासुन त्यांचे संरक्षण करीन हेच वरदान दिले आज मी तुला देत आहे असे म्हणून त्याच ठिकाणी पाषाणमुर्तीत रुपांतर होवून पांडुरंग अंतर्धान पावले.
ही संपूर्ण घटना पाहिल्यावर थोड्याफार अंतरावर थांबलेल्या रखुमाई देखील आहे त्याच ठिकाणी पाषाणमुर्तीत रुपांतर होवून त्याही अंतर्धान पावल्या.

हेची देही हेची डोळा ह्या उक्ती नुसार तेथील उपस्थित जनसमुदाय, हा दैवी चमत्कार पाहुन थक्क झाले आणि एकमुखाने जल्लोषात म्हणाले,
बोला पुंडलिका, वर दे हारी विठ्ठल !
रखुमाई पांडुरंगा, वर दे हारी विठ्ठल !!

आणि त्या दिवसापासून पंढरपुरात विराट अशा जनसमुदायाने विठ्ठल आणि रखुमाई च्या स्वयंभू मूर्तीच्या चरणाला स्पर्श करून माथा टेकून आशिर्वाद घेण्यासाठीची जी रिघ लागली ती अद्यापही अखंडित व अविरत चालू आहे हे विशेष.

अशा तऱ्हेने साक्षात वैकुंठवासी लक्ष्मी विष्णूनी, द्वारकानिवासी श्रीकृष्ण रुक्मिणी च्या रुपात आजही पृथ्वीतलावरच्या ह्या पुण्यनगरीत पंढरपूर इथे पाषाण स्वरुपात स्थितप्रज्ञ झालेला तो पवित्र दिवस म्हणजेच ही आषाढी एकादशी .


आणि म्हणूनच खास ह्या दिवशी कैक लाखांच्या संख्येने भारतातले सर्व वैष्णवभक्त पंढरपूरला जाऊन विठुनामाचा गजर करीत विठ्ठलाच्या चरणी माथा टेकवून आशिर्वाद घेण्यात धन्यता मानतात. आणि नक्कीच ह्या भक्तांच्या पदरी पांडुरंगाचे काही तरी दान व समाधान त्यांना मिळत असणार.

अन्यथा संत ज्ञानेश्वरांनी नऊशे वर्षापूर्वी काही दीडशेच्या संख्येने सुरू केलेल्या वारी ह्या प्रथेला आज कैक लाख भाविकांची वर्णी लागली नसती हे आपल्याला आज मान्यच करावे लागेल. म्हणून बोला,

!! जय जय विठ्ठल, जय हरी विठ्ठल !!
!! जय जय विठ्ठल, जय हरी विठ्ठल !!

★ ★ ★

"कठीण काळात सतत स्वतःला सांगा
शर्यत अजून संपलेली नाही
कारण मी अजून जिंकलेलो नाही."



क्षणचित्रे

# कराड शाखा - वर्धापनदिन

आपल्या यशवंत बँकेच्या कराड शाखेचा १२ वा वर्धापनदिन शनिवार, ९ जुलै २०२२ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. शाखा कार्यालयात बँकेचे संचालक मा.श्री.गोपीनाथ कुलकर्णी व सौ.अनुराधा कुलकर्णी यांच्या शुभहस्ते श्रीसत्यनारायण पूजा संपन्न झाली. दिवसभर बँकेचे सभासद, ठेवीदार व ग्राहकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून वर्धापनदिनाच्या शुभेच्छा दिल्या.











क्षणचित्रे

# रक्तदान शिबिर

कराड शाखा वर्धापनदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यांस रक्तदात्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. शिबिरात एकूण २५ जणांनी रक्तदान केले. या सर्व रक्तदात्यांना बँकेच्या वतीने पुष्पगुच्छ, आभार पत्र व भेटवस्तू देवून सन्मानित करण्यात आले.

















यशवंत को-ऑप. बँक लि. फलटण
सहर्ष स्वागत





# TRUST 666 ठेव योजना शुभारंभ

बँकेच्या सुवर्णमहोत्सवी वाटचालीच्या निमित्ताने जाहीर झालेल्या TRUST ६६६ या योजनेचा शुभारंभ कराड शाखेत करण्यात आला. श्री.मोहिरे कुटुंबीयांनी या योजनेत पहिली ठेव ठेवून योजनेचा शुभारंभ केला.

यावेळी बोर्ड ऑफ मॅनेजमेंन्टच्या अध्यक्षा सौ.कल्पना गुणे ॲड, संचालक गोपीनाथ कुलकर्णी, प्रसाद देशपांडे, सौ.अनघा कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.वैशाली मोकाशी, मुख्य कार्यालय व कराड शाखा अधिकारी – सेवक वर्ग, मोहिरे कुटुंबीय व ग्राहक वर्ग उपस्थित होते.

२०२५ साली सुवर्णमहोत्सवी वर्षात बँकेचा व्यवसाय ६६६ कोटी करण्याचा संकल्प यावेळी दृढ करण्यात आला.











क्षणचित्रे

# SSC/HSC उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थांचा सत्कार समारंभ

कराड शाखा वर्धापनदिनाचे औचित्य साधत नुकतेच इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी शालांत परीक्षेत ८५% हून अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या सर्व विद्यार्थ्यांना बँकेच्या वतीने पुष्पगुच्छ, अभिनंदन पत्र व भेटवस्तू देवून सन्मानित करण्यात आले.

















# बँकेच्या नविन ठेव व कर्ज योजना



## TRUST 666

अविरत सेवेची व जपलेल्या विश्वासाची ४७ वर्षे

कराड शाखेच्या
वर्धापनदिनानिमित्त
सर्व ग्राहकांसाठी सर्वोच्च व्याजदराची
खास ठेव योजना...!

# 8.75%

✓ मुदत ३ वर्षे ते ५ वर्षे
✓ गुंतवणूक मर्यादा रक्कम ₹.१ लाख ते ५ लाख
✓ मासिक व्याज मिळण्याची सुविधा
✓ सामान्य ग्राहक,
सभासद व ज्येष्ठ नागरिकांना
समान व्याजदर

प्रत्येक ठेवीदारास ₹.५ लाखांचे ठेव विमा संरक्षण

## दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण

अधिक माहितीसाठी आजच आपल्या नजीकच्या शाखेला अथवा ग्राहक सेवा केंद्राला भेट द्या...

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | प्रतापगंज पेठ, सातारा |
| 8408802022 | 7875558491 | 9049633555 |

www.yashwantbank.com   admin@yashwantbank.com

## सोने तारण कर्ज योजना

सुलभ व जलद कर्ज प्रक्रिया

प्रति तोळा ₹.४०,०००/-

व्याजदर फक्त १% (मासिक)






## खास सोने खरेदीसाठी कर्ज योजना

### Golden Opportunity Loan Scheme

मासिक व्याजदर फक्त १%


स्वप्नवत सोने खरेदी आता सत्यात उतरणार..!



योजनांचा लाभ घेण्यासाठी आजच नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा...

## दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण

फलटण - कराड - सातारा



# बँकेच्या नविन ठेव कर्ज योजना


## ए.सी., टी.व्ही, फ्रिज, सोलर, वॉशिंग मशीन, इन्व्हर्टर, कॉम्प्युटर, लॅपटॉप, कुलर, मोबाईल, आटाचक्की इत्यादी सर्व घरगुती वस्तु खरेदीसाठी कर्ज योजना सुरू...



नियम व अटी लागू*

कर्जासाठी येणारा मासीक हप्ता

**प्रति हजारी भरा**

१२ महिन्याकरीता रू. ९२/-

२४ महिन्याकरीता रू. ५०/-

३६ महिन्याकरीता रू. ३०/-

* आवश्यक कागदपत्रे *

आधार कार्ड, पॅन कार्ड, दोन फोटो, लाईटबील

- सोपी व सुलभ कर्जप्रस्ताव पध्दती
- त्वरीत कर्ज उपलब्धी

**दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण**

अधिक माहितीसाठी आजच आपल्या नजीकच्या शाखेला अथवा ग्राहक सेवा केंद्राला भेट द्या...

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | तांदुळआळी, सातारा |
| 8408802022 | 7875558491 | 9049633555 |

www.yashwantbank.com admin@yashwantbank.com

## आता ७७ महिन्यातच होणार लक्षाधीश

### अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर आपल्या यशवंत बँकेची नवीन रिकरींग डिपॉझीट योजना



## 'अक्षय्यवृध्दी'

### आवर्त ठेव योजना


दरमहा भरा ₹.१००० — ७७ महिन्यांनी — मिळवा ₹.१ लाख

अधिक माहितीसाठी आजच आपल्या नजीकच्या शाखेस भेट द्या.

**दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण**

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | प्रतापगंज पेठ, सातारा |
| 8408802022 | 7875558491 | 9049633555 |

www.yashwantbank.com admin@yashwantbank.com

# बँक वैशिष्ट्ये - ठेवीचे व कर्जाचे व्याजदर

## दि यशवंत को-ऑप बँक लि; फलटण

### बँकेची वैशिष्टे

- बँक असल्याने प्रत्येक ठेवीदारास रू. ५ लाखांचे ठेव विमा संरक्षण...
- सर्वांत कमी सुट्या असणारी सहकारी बँक...
- सर्व शाखांमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत कॅश सुविधा देणारी बँक
- कोरोना विषाणू काळातही कॅश देण्यावर कोणतीही मर्यादा नाही...
- बचत गटांना केवळ अर्थसहाय्य नव्हे तर प्रशिक्षण देणारी बँक...
- राष्ट्रीय महिला कोषकडून निधी घेणारी राज्यातील पहिली बँक...
- रिकरिंग ठेव (R.D) खात्यावर मिळणाऱ्या रकमेइतके अपघाती विमा संरक्षण देणारी एकमेव बँक...
- मधुमित्र ठेव योजनेत डायबेटिक ग्राहकांना दरमहा मोफत तपासणी...
- ग्रीन फ्युचर ठेव योजनेत ७५० वृक्षांची लागवड व यशस्वी संगोपन...
- यशवंत महोत्सव सांस्कृतिक कार्यक्रम सलग १० वर्षे संपन्न...
- बँकेचे तज्ञ व निस्वार्थी संचालक मंडळ...
- व्यवस्थापन खर्च अत्यंत अल्प प्रमाणात ठेवणारी बँक...
- सामाजिक बांधिलकी जपत सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम...
- प्रत्येक नैसर्गिक आपत्तीत अग्रेसर होवून मदत कार्य करणारी बँक...

**✻ ग्राहक सेवा हा आमचा विभाग नसून स्वभावच आहे. ✻**

अधिक माहितीसाठी आजच आपल्या नजीकच्या शाखेस भेट द्या.

**दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण**

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | तांदुळआळी, सातारा |
| 8408802022 | 7875558491 | 9049633555 |

www.yashwantbank.com admin@yashwantbank.com

## दि यशवंत को-ऑप बँक लि; फलटण

### दि. ०१/१२/२०२१ पासूनचे ठेवीवरील सुधारीत व्याजदर

| अ.नं. | ठेव प्रकार | मुदत | सुधारित व्याजदर |
|---|---|---|---|
| १ | सेव्हिंग्ज ठेव | | ३.५० % |
| २ | स्पेशल सेव्हिंग्ज् ठेव | | ६.५० % |
| ३ | चिरंजिव सेव्हिंग्ज् ठेव | | ३.५० % |
| ४ | पिग्मी ठेव | | ३.०० % |
| ५ | सुपर फ्लेक्सी ठेव | | ५.०० % |
| ६ | अल्प मुदत | किमान १६ दिवस ते ९० दिवस | ५.५० % |
| ७ | अल्प मुदत | ९१ दिवस ते १८० दिवस | ५.७५ % |
| ८ | अल्प मुदत | १८१ दिवस ते ३६४ दिवस | ६.०० % |
| ९ | मध्यम मुदत | १ वर्ष | ७.२५ % |
| १० | मध्यम मुदत | १३ महिने ते २४ महिने | ७.७५ % |
| ११ | मध्यम मुदत | २५ महिने ते ६० महिने | ८.०० % |
| १२ | मासीक व्याज योजना | ३ वर्षे व पुढे | ८.२५ % |
| १३ | मधुमित्र योजना | ३ वर्षे व पुढे | ८.२५ % |
| १४ | आधार (जेष्ठ नागरीक) | ३ ते ५ वर्षे | ८.५० % |
| १५ | दामदुप्पट ठेव | | ८ वर्षे |
| १६ | दामदिडपट ठेव योजना | | ४ वर्षे २ महिने |

**रिकरिंग ठेव प्रकारामध्ये व्याजदर पूर्वीप्रमाणेच राहतील.**

'अ' वर्ग सभासद किंवा जेष्ठ नागरीक यांना १ वर्ष व त्यापुढील कालावधीकरीताच्या ठेवींना ०.२५ टक्के जादा व्याजदर

आपली बँक, यशवंत बँक.

## दि यशवंत को-ऑप बँक लि; फलटण

फलटण-कराड-सातारा

**बँकेच्या नव्या सभासदांसाठी खास आरोग्यदायी ठेव योजना**


### ✻ सभासद आरोग्यवर्धिनी योजना ✻

सुरक्षितता... ठेवींबरोबर आरोग्याचीही..

| सभासद आरोग्यवर्धिनी - फेज १ | एकरकमी दरवर्षी रू. १०००/- चे शेअर्स |
|---|---|
| लॅबोरेटरी चार्जेस :- | |
| १) रक्त तपासणी (वर्षात कमाल मर्यादा रू. २००/-) | रू. १००/- |
| २) लघवी तपासणी (वर्षात कमाल मर्यादा रू.२००/-) | रू. १००/- |
| एक्स रे (वर्षातून एकदाच) | रू. १५०/- |
| कार्डीओग्राम (वर्षातून एकदाच) | रू. २००/- |
| डोळे तपासणी (वर्षातून एकदाच) | रू. १५०/- |
| डोळ्यांचे ऑपरेशन | रू. ५००/- |
| चष्मा खरेदी (एकदाच) | रू. २००/- |
| सोनोग्राफी (वर्षातून एकदाच) | रू. ३५०/- |
| सी.टी.स्कॅन (वर्षातून एकदाच) | रू. ५००/- |
| अंत्यविधी अनुदान | रू. १०००/- |

## कर्जावरील व्याज दर

| अ. नं. | कर्ज प्रकार | दि. ०१/०१/२०१७ पासून बदलेले सुधारित व्याजदर |
|---|---|---|
| १ | सामान्य कर्ज (जामीनकी तारण) | १६.००% |
| २ | स्थावर तारण कर्ज | १६.००% |
| ३ | हायपोथिकेशन कर्ज (जुने वाहन/मशिनरी) | १६.००% |
| ४ | हायपो. कॅश क्रेडीट कर्ज | १६.००% |
| ५ | यशवंत महिला स्वयंरोजगार कर्ज | १५.५०% |
| ६ | सोनेतारण | मुल्यांकनाच्या ५०% - १२%<br>मुल्यांकनाच्या ७५% - १४%<br>मुल्यांकनाच्या १००% - १६% |
| ७ | वाहनतारण कर्ज - मुदत ७ वर्षापर्यंत<br>वैयक्तिक वापराच्या वाहनाकरीता<br>व्यावसायिक वाहनाकरीता | <br>१२.००%<br>१३.००% |
| ८ | गृहबांधणी कर्ज<br>मुदत १५ वर्षापर्यंत | १२.००% |
| ९ | लघुउद्योग(SME) कर्ज रु. १० लाखांपर्यंत कॅश क्रेडिट व टर्म लोन मुदत १ ते ७ वर्षापर्यंत | १२.००% |
| १० | शैक्षणिक कर्ज | १२.००% |
| ११ | सी. आर. ई. कर्ज | १८.००% |



# घर तुमचं हक्काचं... तुमचं स्वतःचं...

# गृहप्रवेश

## गृहबांधणी/खरेदी कर्ज योजना

नवीन फ्लॅट खरेदीसाठी/घर बांधणीसाठी/जुना फ्लॅट/घर खरेदीसाठी
तुमच्या सध्याच्या घराच्या दुरूस्तीसाठी/विस्तारासाठी
एन. ए. प्लॉट खरेदी व बांधकाम दोन्हीसाठी

प्रति लाखास
₹ १२००/-

मुदत
१५ वर्षे

कमाल मर्यादा
₹. ५० लाख

**पात्रता :**
व्यावसायिक – वार्षिक उत्पन्नाच्या ४ पट
पगारदार – निव्वळ मासिक पगाराच्या ६० पट
शेती – वार्षिक उत्पन्नाच्या ४ पट

**उत्पन्न कागदपत्रे :**
व्यावसायिक – गत ३ वर्षाची आयकर विवरण पत्रके
पगारदार – पगारपत्रक, हमीपत्र
शेती – शेती उत्पन्नाची कागदपत्रे, बँक स्टेटमेंट

**आवश्यक कागदपत्रे :**
मिळकतीशी संबंधित अद्ययावत कागदपत्रे,
७/१२ उतारा, सिटी सर्वे उतारा,
मूल्यांकन अहवाल

**कायदेशीर बाबी :**
शोध अहवाल, कायदेशीर मत
आर्थिकदृष्ट्या सक्षम २ जामीनदार
आर्थिक कागदपत्रांसहीत.



## गाडी कोणतीही घ्या... अर्थसहाय्य आम्ही करू...!

### दुचाकी / चारचाकी वाहन खरेदीसाठी

# सुहाना सफर कर्ज योजना

प्रति लाखास
₹ २२२५/-

२४ तासात कर्ज उपलब्ध

100 %
पर्यंत कर्ज उपलब्ध







**आवश्यक कागदपत्रे :**
गाडीचे कोटेशन, मुल्यांकन रिपोर्ट

**आर्थिक कागदपत्रे :**
व्यावसायिक – गत ३ वर्षाची आयकर पत्रके
पगारदार – पगारपत्रक हमीपत्र
शेती – शेती उत्पन्नाची कागदपत्रे
आर्थिकदृष्ट्या सक्षम २ जमीनदार.

